# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक २०.०४.२०२६ सोमवार**

**मा. न्यायालयातुन आरोपींना आजन्म कारावासाची शिक्षा :—**

दिनांक १८.०४.२०२६ रोजी मा. तदर्थ जिल्हा न्यायाधिश—२ तथा अति. सत्र न्यायाधिश, नागपुर श्रीमती शिल्पा एम. बैस मॅडम यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ५८/२०२५ मधील, पोलीस ठाणे एम.आय.डी. सी. येथील अप. क्र. ५४६/२०२४ कलम ३०२, १४३, १४४, १४७, १४८, २०१, ३४ भा.दं.वि., सहकलम ४, २५ भा.ह.का. या गुन्ह्यातील आरोपी १) राज अनिल पाटील, वय २१ वर्षे, रा. भिमनगर, इसासणी, त्रिरत्न बुध्द विहारजवळ, एम.आय.डी.सी., नागपूर २) राणू उर्फ गंगा महेश्वरी पांडा, वय १९ वर्षे रा. रॉय टाऊन सोसायटी, आय.सी. चौक, नागपूर यांचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपींना कलम ३०२, १४९ भा.दं.वि. अन्वये आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा व प्रत्येकी ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्षे साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली. गुन्ह्यातील आरोपी नामे अर्जुन हरीकृष्ण कहार, वय २६ वर्षे, रा. प्लॉट नं. ए—९, रॉय टाऊन, आय.सी. चौक, नागपूर याची निर्दोष मुक्तता केली.

दिनांक ०८.०६.२०२४ चे २२.१० वा. ते २२.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी भाऊराव अर्जुन निंबार्ते, वय ४८ वर्षे, रा. भिम नगर, बुध्द विहारजवळ, एम.आय.डी.सी. यांचा मुलगा नामे बादल भाऊराव निंबार्ते, वय २४ वर्षे हा घरी असतांना त्याचे मोबाईलवर आरोपी राज अनिल पाटील, वय १९ वर्षे, रा. भिमनगर, बुध्द विहार जवळ, एम.आय.डी.सी. याचा फोन आल्याने तो पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. हद्दीत भिम नगर, सावित्रीबाई फुले अंगणवाडी समोर आरोपीस भेटण्याकरीता आला असता, फिर्यादीचे मुलाचे आरोपींसोबत मागील वर्षी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून, आरोपींनी संगनमत करून फिर्यादीचे मुलास धारदार चाकु, लोखंडी रॉडने मारहाण करून जिवानिशी ठार केले होते. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एम. आय.डी.सी. येथे आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपींचा शोध घेवुन आरोपींना अटक करण्यात आली होती. तसेच, त्याचे दोन साथीदार विधीसंघर्षग्रस्त बालक यांचेवर बाल न्यायालय येथे प्रकरण दाखल केलेले होते.

गुन्ह्याचे तपासी अधिकारी तत्कालीन पोउपनि. पंकज सयाम यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री मदन सेनाड यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. जलतारे व चेतन ठाकुर साहेब यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. नितीन सिरसाट यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १९.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०३ ईसमांवर कारवाई करून ४,१७०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जुगार

कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०६ ईसमांवर कारवाई करून एकुण ६,३१०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,६३८ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,६०,४५०/—रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आली असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट ०३ पथकाची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक १९.०४.२०२६ चे २०.०५ वा. ते २३.५५ वा. चे दरम्यान, युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, प्लॉट नं. १३२/१३३, निर्मल कॉलोनी, बोरकर ले—आऊट, जरीपटका, नागपूर येथील नवीन बांधकाम सुरू असलेल्या बिल्डींगचे पहिले माळ्यावरील रूममध्ये दोन ईसमांनी अंमली पदार्थ गांजा साठवून ठेवलेला आहे. अशा खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी पंचासमक्ष जावून रेड कारवाई केली असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचे दोन ईसम मिळून आले. पंचासमक्ष त्यांचे नांव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे आरोपी क्र. १) फिरोज खान सरदार खान, वय ४९ वर्षे, रा. प्लॉट नं. ३३, बाबा बगदादिया नगर, झिंगाबाई टाकळी, मानकापूर, नागपुर २) मोहम्मद शकील मोहम्मद भुरू, वय ५५ वर्षे, रा. कुंदनलाल गुप्ता नगर, नुरी मदरसा, कलीम दवाखान्याजवळ, यशोधरानगर, नागपूर असे सांगीतले. एन.डी.पी.एस. कायद्याचे तंतोतंत पालन करून त्यांचे ताब्यातील रूममधील पोत्यांची पाहणी केली असता, एकुण ०९ पोत्यांमध्ये अंमली पदार्थ गांजा एकुण वजनी ८५ कि.ग्रॅम मिळून आला आरोपींची सखोल विचारपूस केली असता, त्यांनी त्यांचा साथिदार पाहिजे आरोपी हरपितसिंग उर्फ हॅप्पी जसविंदरसिंग सैनी, रा. कपिलनगर, नागपूर याचेकडून खरेदी केल्याचे सांगीतले. तसेच त्यांचे बिल्डींग समोरील उभ्या असलेल्या चार चाकी वाहनांचा खरेदी विक्रीकरीता वापर करीत असल्याचे सांगितले. आरोपींचे ताब्यातून ८५ कि.ग्रॅम गांजा, ०३ मोबाईल फोन, आयशर वाहन क्र. एम.एच. १३ सी.यु. ६१८४, मारूती सुझुकी डिझायर क्र. एम.एच. ४९ बी.झेड. १९१८ तसेच, एसप्रेसो चार चाकी वाहन क्र. एम.एच.४० सी.ए. २८४७ व वजन काटा असा एकुण ४८,७०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता साठा करून बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), २०(ब)(ii)(क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे जरीपटका येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. महेश सागडे, पोउपनि. मधूकर काठोके, सुफौ. सतोष ठाकुर, पोहवा.

अजय पाटील, दिनेश डवरे, मनोज नेवारे पोअं. रोहित काळे, विवेक भोयर, दिपक दासरवार, सहदेव चिघले, प्रमोद देशभ्रतार यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे वाठोडा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १८.०४.२०२६ चे १२.०० वा. ते दिनांक १९.०४.२०२६ चे ०८.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, प्लॉट नं. १०१, विद्या विकास शाळेजवळ, शिवछत्रपतीनगर, वाठोडा नागपूर येथे राहणारे फिर्यादी अनिल बाळकृष्ण बोरसरे, वय ४१ वर्षे, हे त्यांचे राहते घराला कुलुप लावुन नातेवाईकांचे घरी पाचपावली येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ११,०००/— रु. व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागीने असा एकूण १,९१,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. सतीश अहेर ८०५५५२५३०१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**